महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंत्यांसाठी स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा-१११८/प्र.क्र.१२३/पापु-२३
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल
क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४००००१
तारीख: १३ एप्रिल, २०१८

वाचा :

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः इएसटी-१०९७/ प्र.क्र.३७० / पापु-२३, दिनांक ८.०२.१९९९

प्रस्तावना :

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ च्या कलम ६६ मधील तरतूदीनुसार प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भात शासन मान्यतेने विनियम करण्याचा अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आहे. मात्र प्राधिकरणातील सर्व पदांसाठी प्राधिकरणाने स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार केले नसून जलसंपदा विभागाने त्या विभागातील अभियंत्रिकी संवर्गासाठी तयार केलेले सेवाप्रवेश नियम प्राधिकरणाला संदर्भाधीन शासन निर्णयान्वये लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंत्रिकी संवर्गासाठी प्राधिकरणाचे स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार करण्याच्या अनुषंगाने सेवा प्रवेश नियमांचा मसुदा तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंत्यांसाठी प्राधिकरणाचे स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार करण्याच्या अनुषंगाने सेवा प्रवेश नियमांचा मसुदा तयार करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

श्री.महेश सावंत, उप सचिव------------------------- समिती अध्यक्ष

श्री.चेतन निकम, अवर सचिव ----------------------- समिती सदस्य

श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (मजीप्रा) --- समिती सदस्य सचिव

२. सेवाप्रवेश नियमांचा मसुदा तयार करुन अहवाल सादर करण्याकरीता उपरोक्त समितीला १० दिवसांचा कालावधी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१३१५०६३४८९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.04.13 17:26:46 +05'30'

बाळासाहेब बा. हजारे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१)श्री. महेश सावंत, उपसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जीटी रुग्णालय आवार, मुंबई.
२)श्री. चेतन निकम, अवर सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जीटी रुग्णालय आवार, मुंबई.
३)श्री. अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (मजीप्रा),समिती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.

प्रत:- मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
निवडनस्ती, पापु-२३